# मुंबईतील हत्याकांड

## चन्द्रशेखर पुरन्दरे

२६-२८ नोव्हेंबर दरम्यानचा मुंबईवरील हल्ला निरनिराळ्या अंगांनी पहावा लागेल. धर्माच्या नावाखाली हिंसाचार, या घटनेने उघड झालेली भारतीय राज्यसंस्थेची आणि शहरी भारताची भूमिका, भारत-पाकिस्तान आणि आंतरराष्ट्रीय राजकारण व प्रसारमाध्यमांची भूमिका अशा एकमेकांशी संलग्न काही मुद्द्यांचा परामर्श या लेखात घेतला आहे.

प्रथम हिंसाचाराचा मुद्दा पाहू. धर्माच्या नावाखाली हिंसा मानवी समाजाला नवीन नाही. मध्ययुगात मुस्लिम आणि ख्रिश्चन यांच्यातील धर्मयुद्धात मोठ्या प्रमाणावर नरसंहार झाला. दुसऱ्या महायुद्धात युरोपातील ख्रिश्चनांनी ज्यूंच्या हत्या केल्या. आपल्याकडे फाळणीच्या दरम्यान हिंदू-मुस्लिमांचे लाखोंनी बळी गेले. इंदिरा गांधींच्या खुनानंतर दिल्लीत शिखांचे हत्याकांड झाले. अलिकडे गोध्रात मुसलमानांचे हत्याकांड झाले. केवळ धर्माच्या नावावरच नव्हे तर ध्येयवादाच्या नावाखालीही मोठ्या प्रमाणावर हत्याकांडे झालेली आहेत आणि आजही चालू आहेत. साम्यवाद आणण्याच्या मोहिमेत रशिया आणि चीनमध्ये मोठ्या कत्तली झाल्या. साम्यवादाला आळा घालण्यासाठी अमेरिकन भांडवलशाहीने तेवढ्याच प्रमाणावर हिंसा केली. अफगाणिस्तान, इराक, पॅलेस्टाईन असा 'अधिकृत' हिंसाचार आजही चालू आहे. हिंसा कधीही असमर्थनीयच, पण माझ्या मते दहशतवादाची हिंसा ही आजवरच्या सामूहिक हिंसेपेक्षा जरा निराळ्या प्रकारची आहे. ती जास्त नकारात्मक आहे. धर्माचे, आदर्शवादाचे, सत्तापिपासेचे बुरखे असतील पण ती निखळ हिंसेसाठी हिंसा दिसते. त्यामुळे ती आपल्याला अनाकलनीय वाटते. मुस्लिमेतर धर्मीयांना शेकड्याने ठार मारण्याने उद्या कधीतरी इस्लामच्या जागतिक प्रभुत्वाला मदत होईल हा अतर्क्य विश्वास आत्मघातकी श्रद्धेच्या स्तराला का जातो? याचे कारण अशा ध्येयशून्य हिंसेला कोणतातरी मुलामा द्यावा लागतो एवढेच दिसते.

राज्यकर्त्यांनी केलेली हिंसा निदान सत्ता टिकवण्यासाठी, उच्चवर्णीयांची जातीय हिंसा त्यांचे प्रभुत्व टिकवण्यासाठी असते असे म्हणता येते, पण दहशतवाद्यांची हिंसा इतक्या साध्या समीकरणात बसवता येत नाही. अरुंधती रॉय यांचा लेख या अंकात आहे. त्यांनी असा कार्यकारणभाव दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणजे काश्मीरमधील भारतीय सैन्याचे अत्याचार किंवा भारतातल्या मुसलमानांना मिळणारी दुय्यम नागरिकांची वागणूक अशा प्रक्रियांनी मुंबईसारख्या घटनांना खतपाणी मिळते असे त्यांचे प्रतिपादन आहे. यात काही अंशी तथ्य असेल पण मला तरी तो दहशतवाद्यांच्या नकारात्मक हिंसेचा संपूर्ण व समाधानकारक खुलासा वाटत नाही.

पुढचा मुद्दा भारतीय राज्यसंस्थेची भूमिका, शहरी भारताची भूमिका आणि भारतातील अंतर्गत संघर्ष असा आहे. एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की भारतीय भारतीयांवर अत्याचार करत आलेले आहेत. या अत्याचारात प्रत्यक्ष हिंसाचार असेल किंवा अप्रत्यक्ष. पण त्यांच्या बळींची संख्या मुंबईच्या बळींच्या कित्येक पट असते. प्रत्यक्ष हिंसाचाराची उदाहरणे म्हणजे खैरलांजीसारखे जातीय हिंसाचार किंवा नंदीग्रामसारखे अधिकृत शासकीय हिंसाचार. पण एक खैरलांजी उजेडात आले, अशी शेकडो प्रकरणे हरघडी भारतात, विशेषत: ग्रामीण भारतात घडत असतात किंवा शासकीय दडपशाही चालूच असते. अप्रत्यक्ष हिंसाचार म्हणजे जगण्यास लागणाऱ्या मूलभूत संसाधनांवरील (जमीन, पाणी) नियंत्रण आपल्या हातात बळजबरीने राखण्याचा शासनाचा किंवा उच्चवर्गीयांचा प्रयत्न. या संसाधनांपासून बहुसंख्यांक निम्नस्तराला वंचित ठेवण्यासाठी छुपा हिंसाचार होतो. त्याची ना दाद ना फिर्याद. हुंडाबळी, शासकीय दुर्लक्षातून पडणारे भूकबळी, साध्या आजाराने होणारे मृत्यू. हा सगळा अप्रत्यक्ष हिंसाचार. त्याचा कर्ता व्यवस्थाच असते. पण याकडे दुर्लक्ष होते. कारण हा 'आमचा' 'अंतर्गत' हिंसाचार असतो. पण मुंबईच्या घटनेसारखा 'इतरांनी', 'त्यांनी' केलेला हिंसाचार जसा पटकन नजरेत भरतो, तसा हा हिंसाचार डोळ्यावर येत नाही. या दृष्टिकोनाला सरकारी उदासीनतेबरोबर सामाजिक शैथिल्यही जबाबदार आहे.

आता या हल्ल्याचे 'शहरी' स्वरूप पाहू. मुंबईसारख्या महानगरावरचा हल्ला - त्यातही ताज-ओबेरॉय वरचा हल्ला - हा कार्पोरेट इंडियावरचा हल्ला होता. ताज-ओबेरॉयमध्ये सुखवस्तू परदेशी किंवा धनाढ्य भारतीयच जातात. भारत ही 'उगवती महासत्ता' असल्याच्या दाव्याची ही हॉटेल्स् प्रतीके आहेत. मग भले या महासत्तेची बहुसंख्य जनता दारिद्र्यरेषेखाली का असेना. जगाला दाखवायचा भारताचा चमकता चेहरा म्हणजे ताज-ओबेरॉय. या प्रतिमेला तडा जाणे प्रस्थापिताला परवडले नाही. त्यामुळे मुंबईवरचे संकट म्हणजे एका बाजूला ताज-ओबेरॉय-ज्यूंवरचे संकट तर दुसऱ्या बाजूला भारतीय सार्वभौमत्वावरचे संकट असा एकूण देखावा तयार झाला. वस्तुत: ५५-५६ लोक व्ही.टी.वर मारले गेले. त्यांचा नामोल्लेख सोडा, जेमतेम आकडे प्रसिद्ध झाले. कारण ती सामान्य माणसे. काही मुस्लिम तर ग्रामीण बिहारमधून आलेले स्थलांतरित. त्यांना भारतातच किंमत नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावर ताज-ओबेरॉय किंवा ज्यूंचे ग्लॅमर कसे असणार? तात्पर्य, या निमित्ताने देशभक्तीची आपली सापेक्ष व्याख्या तपासायला हवी. शहरी भारतावर हल्ला झाला, की शहरी आणि ग्रामीण या दोन्ही भागांनी एकत्र यावे ही अपेक्षा या देशभक्तीमागे आहे. पण ग्रामीण भारतावरील रोजच्या अत्याचारांविरुद्ध शहरी भारत किती वेळा उभा राहतो?

पुढचा मुद्दा शासनाच्या भूमिकेचा आहे. आपल्या नागरिकांच्या जीविताची सुरक्षा राखणे हे कोणत्याही शासनाचे किमान कर्तव्य असते. महाराष्ट्र सरकार काय किंवा भारत सरकार काय - ही जबाबदारी पार पाडू शकले नाही हे तीन दिवस सगळ्या जगाला दिसले. दहशतवादविरोधी विशेष प्रशिक्षण घेतलेले कमांडो दल घटनास्थळी हजर व्हायलाच ९-१० तास गेले. त्या दरम्यान बहुतेक बळी पडले होते. म्हणजे, ग्रामीण भारतात जे शासन आपल्या नागरिकांकडे ज्याप्रकारे दुर्लक्ष करते, तेच शासन शहरी भागातही तेवढेच बेफिकीर असते हे उघड झाले. शहरी भारताला याचा राग आला. 'आम्ही जास्त कर भरतो मग आम्हाला वागणूकही दरिद्री भारतापेक्षा चांगल्या दर्जाची मिळाली पाहिजे' ही शहरी भारताची शासनाकडून असलेली गृहीत अपेक्षा आहे. त्या अपेक्षाभंगाने गदारोळ उठला. हा मुद्दा अरुंधती रॉय यांच्या लेखात आला आहे. म्हणून त्यावर अधिक लिहीत नाही. आता भारत-पाकिस्तान संबंध आणि आंतरराष्ट्रीय राजकारण या घटनेसंदर्भात पाहू.

मी ज्या पश्चिम युरोपमध्ये राहतो, तेथे आणि अमेरिकेत मुसलमानांविरुद्ध वातावरण २००१ च्या अमेरिकेवरील हल्ल्यापासून तापत आहे. २००१ नंतर ब्रिटनची राजधानी लंडन, स्पेनची राजधानी माद्रिद येथेही लोकल ट्रेन्सवर हल्ले करून मुस्लिम अतिरेक्यांनी अनेक निरपराधांचे बळी घेतले. पश्चिमेत साधारणत: १० ते १२ टक्के मुसलमान आहेत. ही टक्केवारी भारतीय लोकसंख्येतील मुसलमानांच्या प्रमाणाच्या जवळपास आहे. अल्पसंख्याकांचे हे प्रमाण सामाजिक धोरण आखण्यासाठी नेहमीच प्रश्नचिन्ह उभे करते. त्यात अल्पसंख्याकांची मूल्यव्यवस्था जर समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अगदी अलग असेल (भारतीय मुसलमानांची मूल्यव्यवस्था फारशी अलग नाही हे आवर्जून नमूद करायला हवे.) तर सामाजिक अभिसरणात व्यत्यय येतो. पश्चिमेत स्थायिक झालेल्या बहुसंख्य मुस्लिमांची मूल्यव्यवस्था पश्चिमेच्या मुख्य प्रवाहापासून अगदी निराळी असली तरी या दशकापर्यंत ती मूल्यव्यवस्था समांतर राहत असे; संघर्षाची वेळ येत नसे. गेल्या काही वर्षांत हे चित्र पालटले आहे. मुसलमानांची निष्ठा मक्केवर जास्त आणि राहत्या देशात - म्हणजे इंग्लंड, फ्रान्स, स्पेनवर कमी - अशी एक सर्वसामान्य भावना येथे मूळ धरू लागली आहे. आपल्याकडेही स्वातंत्र्यापासून प्रत्येक हिंदू-मुस्लिम संघर्षात यांची निष्ठा पाकिस्तानवर आहे असे आरोप होत असतात. किंबहुना, मुंबईतील घटना ही पहिली वेळ असावी जेव्हा भारतीय मुसलमानांवर हे आरोप झाल्याचे निदान माझ्या तरी वाचनात येथे आले नाही.

या पार्श्वभूमीवर 'मुसलमान असेच वागणार' अशी पद्धतीने या घटनेची चिकित्सा येथे केली गेली. पश्चिमेतील मुसलमानांविरुद्ध आकसाला आणखीही काही छोट्या घटना कारणीभूत आहेत. दोन-चार वर्षांपूर्वी एका डच वृत्तपत्राने मोहम्मद पैगंबराची कार्टून्स प्रसिद्ध केली होती. त्यात मोहम्मदाच्या फेट्यामध्ये बॉम्ब दाखवला होता. त्यावर मुस्लिम जगात गहजब माजला होता. इंडोनेशियापासून, मध्यपूर्वेसकट युरोपपर्यंत मोठेच निषेध मोर्चे निघाले. त्यावर पश्चिमेने 'हा आमच्या संस्कृतीतील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न आहे' असा पवित्रा घेतला होता. फ्रान्समध्ये मध्यंतरी मुसलमान मुलींना शाळेत जाताना डोक्यावरून रूमाल बांधायला परवानगी नाकारण्यात आली होती. 'बुरखा घालणाऱ्या मुस्लिम महिला ब्रिटिश समाजात मिसळू इच्छित नाहीत' असे विधान काही काळापूर्वी ब्रिटिश गृहमंत्र्याने केले होते. अशा घटनांमुळे 'मुसलमान येथे का राहतात, राहतात ते राहतात पण सामावलेही जात नाहीत' याविरुद्ध असंतोषाला भारतातील अतिरेकी घटनेने खतपाणीच मिळाले. त्यातही अंत:स्थ विचारप्रवाह लक्षणीय असतो. आमच्याकडे आम्ही मुसलमानांना समान वागणूक देऊनही ते देशद्रोही वागतात. भारतात मुळातच त्यांना दुय्यम वागणूक दिली जाते त्यामुळे पाकिस्तानी दहशतवाद्यांना स्थानिक भारतीय मुसलमानांनीही मदत केली असल्याचे ध्वनित केले गेले. त्यात या घटनेच्या सुरूवातीला 'डेक्कन मुजाहिद्दीन' नावाच्या संघटनेने या हत्याकांडाची जबाबदारी स्वीकारल्याचे वृत्त प्रसृत झाले होते, त्याचा उल्लेख केला गेला.

पश्चिम आणि ज्यू हे एक चमत्कारिक नाते आहे. दुसऱ्या महायुद्धात युरोपमधील ख्रिश्चनांनी ज्यूंचे मोठ्या प्रमाणावर शिरकाण केले. मग पश्चिमेच्या पाठिंब्यावर इस्रायलची निर्मिती झाली. पॅलेस्टिनी लोकांच्या पारंपारिक भूमीवर अमेरिकेच्या लष्करी आणि आर्थिक पाठिंब्यावर इस्रायल टिकून आहे. दुसऱ्या महायुद्धातील ज्यूंच्या विरुद्ध झालेल्या हिंसाचाराची दखल लगेच व मोठ्या प्रमाणावर घेतली जाते. नरिमन हाऊसमधील ज्यूंच्या कत्तलीला, त्यातही त्यांच्या धर्मगुरूच्या कत्तलीला येथे मोठी प्रसिद्धी मिळाली. यातही सूर असा होता की, ज्यू द्वेषाच्या पापातून आम्ही केव्हाच मोकळे झालो पण मुसलमान मात्र त्यात अजून अडकलेले आहेत आणि हल्ला हिंदू-ज्यू-ख्रिश्चन या इतर धर्मीयांविरुद्ध आहे. मुस्लिम दहशतवाद्यांबरोबर पश्चिमेची एक प्रमुख भीती म्हणजे अणुयुद्धाची शक्यता. आपल्याकडे या भयगंडाची कल्पना येणार नाही. एकतर आपल्याकडे दैनंदिन जीवनसंघर्षच पुरेसे तीव्र असतात. दुसरे म्हणजे 'व्हायचे ते होईल' हा दैववाद भारतीय मानसिकतेत मुरलेला आहे. इथे तशी परिस्थिती नाही. त्यात भारत-पाकिस्तान हाडवैरी आणि अण्वस्त्र शस्त्रधारी देश. त्यामुळे, या घटनेपाठोपाठ या दोन देशांत अणुयुद्ध भडकते की काय या भीतीने पश्चिम हादरली. अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्री कोंडोलीझा राइस इतक्या तातडीने भारत-पाकिस्तानच्या भेटीला येण्याचे हे प्रमुख कारण होते. त्यात पाकिस्तानच्या बाबत अमेरिकेची मोठीच अडचण आहे. अफगाणिस्तानातील तालिबान-अल्-कईदा विरुद्धच्या युद्धात अमेरिकेला पाकिस्तानची मदत जरूरी आहे. त्यासाठी पाकिस्तानचे सैन्य पश्चिम सीमेवर असणे आवश्यक आहे. भारताविरुद्ध आघाडी उभारली तर हे सैन्य तेथून काढले जाईल. पण अफगाण युद्धाला

पाकिस्तानी जनतेचा पाठिंबा नाही. किंबहुना याबाबत आपले सरकार अमेरिकेच्या हातचे बाहुले झाल्याची भावना आहे. पण भारतविरोधी भावना पाकिस्तानात सतत जागरूक असते. त्यामुळे भाराताविरुद्ध युद्ध करायला पाकिस्तानी जनतेचा पाठिंबा मिळवणे पाकिस्तानी लष्कराला अधिक सोपे आणि सोईचे आहे. त्यात पाकिस्तानच्या अस्थिर परिस्थितीची भर पडते. पाकिस्तानात नावाला आज लोकशाही सरकार असले तरी खरी सत्ताकेंद्रे इतर तीन आहेत. ती म्हणजे मुस्लिम दहशतवादी संघटना, पाकिस्तानी लष्कर आणि पाकिस्तानची गुप्तहेर संघटना. यांपैकी कोणावरच निर्वाचित सरकारचे नियंत्रण नाही. अशा अराजकात दारिद्र्य, बकाली आणि पंजाब-सिंध-बलुचिस्तान-वायव्य सरहद्द प्रांत यांच्यातील वैमनस्य भर घालते. परिणामत: मुस्लिम मूलतत्त्ववाद्यांनी पाकिस्तानात या घटनेबाबत असा प्रचार केला की - हिंदू दहशतवादीच या घटनेमागे आहेत. मुसलमानांना बदनाम करण्यासाठी हा कट भारताने रचला होता. यावरून भारत-पाकिस्तानमधील जनतेच्या मतातील अंतराची कल्पना यावी.

मुळात, पाकिस्तानसारख्या फसलेल्या राष्ट्राकडून इतर काही अपेक्षाच ठेवणे चूक आहे. तेथून भारताला फक्त उपद्रवच होऊ शकतो. आज आपल्याकडे थोडीतरी संस्थात्मक संरचना शाबूत आहे. पाकिस्तानात ही परिस्थिती नाही. लोकलज्जेस्तव का होईना, पण आपल्याकडे केंद्रीय गृहमंत्री, राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री राजीनामे तरी देतात. जर उलट घटना पाकिस्तानात घडली असती, तर सगळे मुस्लिम जग रस्त्यावर आले असते. म्हणजे हिंदू दहशतवाद्यांनी समजा बोटीने कराचीपर्यंत जाऊन तिथे आत्मघातकी हल्ले केले असते, तर पैगंबराच्या कार्टून्स सारखाच निषेध जगभर उसळला असता - याचीही दखल येथील एका वृत्तपत्राने घेतली.

अशा घटना परत घडू नयेत म्हणून पश्चिमेत काय उपाय योजले जातात. ते आता पाहू, ब्रिटनमध्ये नागरिकांवरील सरकारची देखरेख अधिक तीव्र झाली आहे. प्रत्येक घटकेला नागरिक काय करत असतो - फोनवर कोणाशी बोलतो, कोणाला केव्हा, कोठे भेटतो, इंटरनेटवर काय संपर्क साधतो, कोणत्या दुकानात काय खरेदी करतो, पैसे किती असतात - अशी सगळी माहिती क्षणोक्षणी सरकारकडे जमा होत असते. ही माहिती सुरक्षेच्या नावाखाली गोळा केली गेली, तरी त्यात धोकेही असतात. नागरिकाला छळण्यासाठी, ब्लॅकमेल करण्यासाठी या माहितीचा गैरवापर केला जाऊ शकतो. किंबहुना शासनाकडे जास्त अधिकार द्यावेत असा एक विचार पुढे येऊ शकतो. आपल्याकडे लोकसंख्येचे प्रमाण पाहता हा पर्याय परवडण्यासारखाच नाही. व्ही.टी. स्टेशनवरच कित्येक लाख लोक रोज ये-जा करतात. यातल्या कोणाची झडती घेणार आणि कोणाला क्लोज सर्किट कॅमेऱ्यावर टिपणार? आणि परवडले तरी हा पर्याय व्यक्तीस्वातंत्र्याच्या दृष्टीने श्रेयस्करही नाही.

नेमकी याबाबत प्रसारमाध्यमांची भूमिका अहितकारक दिसून आली. त्यांनी भारत विरुद्ध पाकिस्तान, सरकार कसे अक्षम आहे, यावर भर दिला. राजकारणाची विश्वासार्हता कमी झाली की संवादाची शक्यता दुरावते, उजव्या शक्तींना बळ लाभते. पण सामूहिक द्वेषात भर घालण्याची भूमिका प्रसारमाध्यमांनी बजावली. कोणत्याही घटनेचे उथळ विश्लेषण करणारे तज्ज्ञ आपल्याकडे रातोरात तयार होतात आणि टीव्हीवर तारे तोडतात. त्यामुळे मानवी वेदनेपेक्षा प्रसंगाच्या सनसनाटीपणाकडे लक्ष वेधले जाते. एखादा भयपट ७२ तास दाखवावा अशा आवेशाने सगळ्या वाहिन्यांनी हा कार्यक्रम दाखवला. यानंतरच्या दोन दिवसांतच पश्चिमेच्या प्रसारमाध्यमांचा या प्रकरणातील रस संपला. लेख लिहिण्याच्या वेळी, गेले दहा-बारा दिवस इस्रायलच्या पॅलेस्टाईनवरील चढाईने ती जागा घेतली आहे. प्रसारमाध्यमांचा एखाद्या घटनेतील सहभाग अगदी तात्कालिक असतो. त्या विशिष्ट वेळी माध्यमे जी घटना दाखवतात ती जगातील सगळ्यात महत्त्वाची घटना असल्याचा आभास निर्माण केला जातो. अशा अवास्तव प्रक्षेपणामुळे सामाजिक शिक्षण दूरच पण सामाजिक संवेदनाशून्यता वाढायला मदत होते. आतंकवादाबाबत पश्चिमही गोंधळलेली आहे. मानवी जीवन हे पवित्र मूल्य आहे, हे गृहीतच आतंकवाद नाकारतो. आत्मघातकी हल्लेखोर इतरांची तर हत्या करतातच पण स्वत:ही बळी जायला तयार असतात. ही मानसिकता कळून घेण्यासाठी पाश्चात्त्य विचारसरणी अपुरी पडते. मग, इथेही, या प्रवृत्तीमागची भौतिक कारणे शोधली जातात. उदाहरणार्थ, तेलाच्या लोभाने अमेरिका मध्यपूर्वेतील अनेक हुकूमशाही टिकवल्या आहेत. एकूणच मुस्लिम जगात मागासलेपणा, स्त्रियांना दुय्यम वागणूक, प्रसारमाध्यमांवर नियंत्रण, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या दृष्टीने पिछाडी अशी अठराव्या शतकातील परिस्थिती आहे. मग उरलेले जग कोठे चालले आहे, हा प्रश्न त्या देशातील तरुणपिढी विचारते आणि काळाची चाके उलटी फिरवण्याचा प्रयत्न होतो. 'पूर्वीचा इस्लाम' ही भूतकाळातील दंतकथा न राहता ती अद्‌भुत व रम्य वास्तव होते आणि त्या 'विरुद्ध' असणारे सगळे मुस्लिमेतर शत्रू ठरतात. त्यांच्याविरुद्ध लढण्याची लष्करी ताकद नसल्याने असे वैयक्तिक उद्रेक होतात. एकूण पश्चिमेच्या आतंकवादाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचा हा आढावा आहे.

म्हणून, लेखाच्या सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे, मला तरी, हा आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने हिंसेसाठी हिंसा या विकृतीचा आविष्कार वाटतो. पण या निमित्ताने उच्चभ्रू भारत आणि दरिद्री भारत यातील दरीचे दर्शनही झाले आहे. त्यावर विचारमंथन सुरू झाल्यास वाईटातून तेवढेच चांगले निघेल.

***चन्द्रशेखर पुरन्दरे***
*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*

❐